# भारत देशात एलआयसीला पर्याय नाही.

## - आमदार प्रशांत ठाकूर

पनवेल (प्रतिनिधी) जागतिकीकरणामुळे विविध क्षेत्रांमध्ये परदेशी कंपन्यांनी देशात आपले पाय रोवले, विमा क्षेत्रातही तसेच झाले अनेक जागतिक पातळीवरील विमा कंपन्या येथे आल्या परंतू भारतातील विमा क्षेत्रात मात्र भारतीय जीवन विमा निगमला पर्याय नाही असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी खांदा कॉलनी येथे केले.

भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या पनवेल शाखेतून मिलियन डॉलर राऊंड टेबल, यू. एस. ए. मानांकन मिळवलेल्या विमा प्रतिनिधींचा गौरव सोहळा खांदा कॉलनी येथील साईनंदन सभागृहात रविवारी (दि.२३) आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात वर्षभरात ३६ लाख रूपये उद्दीष्ट पार करणाऱ्या मनिषा कवळे, सर्वजित प्रजापती, सारीका नेरकर, मुकेश शहा यांचा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर पुढे म्हणाले की, सध्याचे युग हे स्पर्धेचे आहे प्रत्येक क्षेत्रात मोठी चढाओढ सुरू आहे. अशा वेळी भारतीय जीवन विमा नागरीकांच्या मनावर बिंबविणे हे मोठे जिकरीचे काम आहे. एमडीआरटीचा टप्पा पार करतांना या कामातील एलआयसी प्रतिनिधींची आत्मियता, समर्पण दिसून येते. एल आय सी मुळे अनेक सुशिक्षित बेरोजगारांना संधी उपलब्ध झाली, त्यांना रोजगार मिळाला असे सांगून एलआयसीने माणसाच्या जीवनाची मरणाच्याआधी व मरणानंतरची काळजी घेतली आहे याबद्दल भारतिय आयुर्विमा अधिकारी, प्रतिनिधींना धन्यवाद दिले व यशस्वी विमा प्रतिनिधींचे अभिनंदन केले.

विमा प्रतिनिधींच्या गौरव सोहळयास शाखा प्रतिबंधक नितिन वैद्य, उपप्रबंधक सुभाष नखाते, डॉ.अरूणा तिजारी, सेल्सटॅक्सचे सहाय्यक आयुक्त डॉ.प्रमोद भोसले, गणेश घोणे आदी मान्यवरांसह पदाधिकारी विमा प्रतिनिधी व नागरीक मोठया संख्येने उपस्थित होते.